## स्थायी समिती
## दाखल विषय – दि. २७/१०/२०२०

**विषय क्रमांक :– ६८४ त्वर्य**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर वस्तीगृह घोलेरोड, शिवाजीनगर येथे विविध दुरुस्ती विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अंजनी असोशिएट्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६२,५३,६८२/– पेक्षा ३२.५५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४२,१८,१०८=५० किंवा उपलब्ध तरतुद रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ७,५०,४४१=८४ अधिक मटेरियल टेस्टिंग र.रुपये१,४७०/– अधिक निविदा अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/३९२ दि. २६/१०/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ६८५ त्वर्य**

रामटेकडी वानवडी क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत दैनंदिन देखभाल दुरुस्तीची व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८८,८४,८२०/– पेक्षा ३०.७०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६३,७३,०८१=३९ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,६६,१७८=४० पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये४२,४०२/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ६,०९०/– पर्यंत अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/३९३ दि. २६/१०/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ६८६ त्वर्य**

धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत एम.एन.जी.एल./महावितरण व इतर विभागामार्फत खोदाई करण्यात आलेल्या रस्त्यांचे पृष्ठभागावर रिईनस्टेटमेंट व इतर तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शिवस्वयंभु रिएल्टर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८८,७१,०८२/– पेक्षा ३३.७९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५८,७३,५४३=३९ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,६४,५२९=८४ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ४९,४६९/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये १३,९६५/– पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/३९४ दि. २६/१०/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ६८७ त्वर्य**

ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत दैनंदिन देखभाल दुरुस्तीची व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८८,८४,८२०/– पेक्षा ३०.७०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६१,५७,१८०=२६ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,६६,१७८=४० पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ४२,४०२/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ६,०९०/– पर्यंत अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/३९५ दि. २६/१०/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ६८८ त्वर्य**

आरोग्य खात्याचे अन्न व परवाना विभागामार्फत सन २०२०–२१ मध्ये देण्यात येणारे आरोग्य परवाने तडजोड फीची आकारणी न करता नुतनीकरण करणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/एचएलओ/३९६ दि. २६/१०/२०२० चे पत्र.

१. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने पुणे शहरात माहे मार्च २०२० पासून लॉक डाऊन लागू केल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३७६ मधील तरतुदी नुसार सन २०२०–२१ या वर्षाकरीता देण्यात येणाऱ्या विविध प्रकारचे आरोग्य परवान्यांचे नुतनीकरण करताना दि.१ एप्रिल २०२० ते ३१ डिसेंबर २०२० अखेर या मुदतीत संबंधीत परवानाधारक यांचेकडून अर्ज प्राप्त झाल्यास त्यांचेकडून प्रचलित कार्यपध्दतीनुसार तडजोड फीची आकारणी न करता फक्त आरोग्य परवाना फी + विलंब फीची आकारणी करून आरोग्य परवाना नुतनीकरण करणेस.

२. सन २०२०–२१ करीता ३१ डिसेंबर २०२० नंतर परवाना नुतनीकरण करणेसाठी परवानाधारकाकडून अर्ज प्राप्त झाल्यास त्यांचेकडून पुणे मनपाचे प्रचलित कार्यपध्दतीनुसार आरोग्य परवाना फीच्या १००% तडजोड फीची आकारणी करणेस व सन २०२१–२२ करीता प्रचलित मान्य धोरणानुसार आरोग्य परवाना फी +विलंब फी व तडजोड फीची आकारणी करून एकूण २ वर्षांकरीता आरोग्य परवाना नुतनीकरण करणेस.

३. सन २०२०–२१ करिता आरोग्य परवाना नुतनीकरण करताना यापूर्वी ज्या आरोग्य परवानाधारकाकडून १ एप्रिल २०२० ते ३१ डिसेंबर २०२० अखेर याकालावधीत तडजोड फीची वसुली करण्यात आलेली आहे ती रक्कम त्या परवानाधारकाचे पुढील वर्षाचे आरोग्य परवाना फी पोटी वर्ग करून घेणेस.

४. तसेच सन २०२१–२२ पासून दरवर्षी विहित मुदतीनंतर आरोग्य परवाना नुतनीकरण प्रकरणे प्राप्त झाल्यास संबंधीत परवानाधारकांकडून खालील प्रमाणे सुधारीत दराने विलंब फी + तडजोड फीची आकारणी करून आरोग्य परवाना नुतनीकरण करणेस.

| अ.क्र. | परवाना नुतनीकरणासाठी अर्ज दाखल केल्याचा कालावधी | प्रचलित विलंब फी | सन २०२१–२२ पासून सुधारित विलंब फी | तडजोड फी |
|---|---|---|---|---|
| १ | दि.१ जानेवारी ते ३१ जानेवारी | --- | --- | --- |
| २ | दि.१ फेब्रुवारी ते ३१ मार्च | ६/- | २५/- | --- |
| ३ | दि.१ एप्रिल ते ३० जून | ६/- | ५०/- | परवाना फी च्या २५% |
| ४ | दि.१ जुलै ते ३० सप्टेंबर | ६/- | १००/- | परवाना फी च्या ५०% |
| ५ | दि.१ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर | ६/- | २००/- | परवाना फी च्या १००% |

**विषय क्रमांक :– ६८९ त्वर्य**

पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाकडील सन २०२०-२१ चे 'क' अंदाजपत्रकातील महसुली कामातील शिल्लक रक्कमेतून पाणी पुरवठा विभागातील महसुली कामे करणे करीता रक्कम रुपये १०५०.०० लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/३९७ दि. २७/१०/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ६९० त्वर्य**

पुणे मनपाच्या विविध विभागांसाठी, विविध रुग्णालये व १५ क्षेत्रीय कार्यालयासाठी स्टेशनरी साहित्य खरेदी करणे या कामी निविदा मागविल्या असता आलेल्या ८ निविदांपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारक मे.हेमदीप एंटरप्रायझेस यांचेकडून पुर्वगणकपत्रक रक्कमेच्या 9.999% कमी म्हणजेच रक्कम रु. 35,27,139=19 (सर्वकरांसह) पर्यंत खालील कोष्टकानुसार काम करून घेणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा, तसेच त्यापोटी बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/भांडार/३९८ दि.२७/१०/२०२० चे पत्र.

मे.हेमदीप एंटरप्रायझेस

| अ.क्र. | कामाचे नाव | परिमाण | कामाची एकूण किंमत र.रु. सर्वकरांसह |
|---|---|---|---|
| 1) | पुणे मनपाच्या विविध विभागांसाठी, विविध रुग्णालये व १५ क्षेत्रीय कार्यालयासाठी स्टेशनरी साहित्य खरेदी करणे | निविदेतील यादी प्रमाणे अ.क्र 1 ते 26 | र.रु. 35,27,139=19 (सर्वकरांसह) |
| एकून रक्कम रुपये ( सर्वकरांसह ) | | | र.रु. 35,27,139=19 |

**विषय क्रमांक :– ६९१ त्वर्य**

Operation & maintenance of 50 MTPD mixed waste processing plant at Narhe road, Dhayari for a period of 10 years कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या 3 टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ग्रीन सोलुशन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९,०८,८५,०००/– (जी.एस.टी. वगळता) पेक्षा १५.५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७,६७,९७,८२५/– (जी.एस.टी. वगळता) अधिक Price Adjustment Clause नुसार येणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/३९९दि. २७/१०/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ६९२ त्वर्य

कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भाव -कोविड केअर सेंटर आणि संस्थागत विलगीकरण कक्षामधील नागरिक (पेशंट)यांच्यासाठी शिजविलेले अन्न तयार करणे, वाटपकरणे कामी जननी महिला मंडळ यांनी केलेल्या कामाच्या देयकाची मुळ रक्कम अधिक GST अदा करणेबाबत मा.प्रकाश ढोरे व मा.अशोक कांबळे यांचे दि. ६/१०/२०२० चे पत्रावर झालेला मा.स्थायी समितीने ठराव क्र.६१८,दि.०६/१०/२०२० ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/अतिक्रमण/४०० दि.२७/१०/२०२० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

विषय क्रमांक :– ६९३ त्वर्य

पुणे महानगरपालिकेसाठी २ वर्षाकरिता अ‍ॅन्टी व्हायरस सॉफ्टवेअर लायसन्स खरेदी करणे व देखभाल करणे कामी निविदा मागविली असता आलेल्या ५ निविदांपैकी निविदाधारक मे.प्रियाटेक सोल्युशन (पुणे) प्रा.लि. यांचे दर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून काम करून घेणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मावतं/४०२ दि. २७/१०/२०२० चे पत्र.

1. पुणे महानगरपालिकेसाठी २ वर्षाकरिता अ‍ॅन्टी व्हायरस सॉफ्टवेअर खरेदी व देखभाल करणे या कामकाजासाठी मे.प्रियाटेक सोल्युशन (पुणे) प्रा.लि यांचेकडून कामकाज करून घेणेस,
2. मे.प्रियाटेक सोल्युशन (पुणे) प्रा.लि यांच्याकडून २ वर्षाकरिता अ‍ॅन्टी व्हायरस सॉफ्टवेअर खरेदी व देखभाल करणे या कामाचा कार्यादेश देणेस व निविदेतील अटी व शर्तीनुसार करारनामा करणेस,
3. मे.प्रियाटेक सोल्युशन (पुणे) प्रा.लि यांना र.रु 24,83,702/- + टॅक्स नुसार बिल अदा करणेस व होणारा खर्च खालील अर्थशिर्षकावर करणेस,

   RE11N103

   (सन २०२०-२०२१)

   विशेष प्रकारची हिशोबी कामे संगणकामार्फत करून घेणे व तदनुषंगाने कामे करुन घेणे,

   ERP अंमलबजावणी, Software Development,

   GIS,Work Management System, Kiosk व तदनुषंगिक कामे करणे.

विषय क्रमांक :– ६९४ त्वर्य

मा.प्रमोद ओसवाल यांचे दि. २६/१०/२०२० चे पत्र.

श्री लक्ष्मण सोपान टोणपे प्रोपाराईटर अर्बन स्पेस M.ARCH (अर्बन डिझाईन) यांचेकडे ही शैक्षणिक पात्रता आहे.

मनपा उद्यान विभागामध्ये लॅण्डस्केप कन्सल्टंट आर्किटेक्ट म्हणून यांची नियमानुसार/अटीनुसार नेमणूक करण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– ६९५ त्वर्य

मा.राजेंद्र शिळीमकर व मा.महेंद्र पठारे यांचे दि. २७/१०/२०२० चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र.४२० दि.११/०८/२०२० चा फेरविचार करून खालीलप्रमाणे दुरूस्ती करण्यास मान्यता देण्यात यावी.

सदर निविदेमधील डाटा एंट्री ऑपरेटरची संख्या अपुरी असून पुणे मनपाच्या विविध विभागांमध्ये सध्य:स्थितीमध्ये कामांची व्याप्ती पाहता डाटा एंट्री ऑपरेटर्सची आवश्यकता मोठया प्रमाणावर आहे

तरी पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्यांकरिता डाटा एंट्री ऑपरेटर यांची सेवा ६ महिन्यांकरिता उपलब्ध करून देणेकामी निविदेमधील डाटा एंट्री ऑपरेटर्स पुरविण्याची संख्या ४० ने अधिक वाढविण्यास

विषय क्रमांक :– ६९६ त्वर्य

मा.आबा बागुल यांचे दि. २३/१०/२०२० चे पत्र.

पुणे महापालिकेचे उत्पन्न वाढीसाठी मनपाच्या मालकीच्या सदनिका विक्री करणे, ॲमिनिटी स्पेसेस विक्री करणेबाबत आपण निर्णय घेत आहोत. पुणे महापालिकेचे उत्पन्न कमी होत असून उत्पन्नाचे जकात, एलबीटी सारखे मार्ग बंद झालेले आहेत. उत्पन्नाची बाजू कमकुवत होत असल्याने पुणे महापालिकेचे उत्पन्न कायमस्वरूपी वाढविणेसाठी आम्ही वेळोवेळी शाश्वत पर्याय सुचवित असतो. यामध्ये आम्ही मा.स्थायी समितीपुढे टुरिझम टॅक्स आकारणी करणेबाबत ठराव

दिलेला होता. पुणे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविणे म्हणजे मनपाची संपत्ती विक्री करणे नाही तर शहरात देण्यात येणा–या सुविधांवर योग्य कर घेणे.

तसेच पुणे शहरातील नागरिकांना आरोग्याची सुविधा देणे स्थानिक स्वराज्य संस्थेस कायदयाने बंधन असून याकामी पुणे मनपाने रूग्णालये उभारली आहेत. कोरोनाने पुण्यामध्ये शिरकाव केल्यावर पुणेकरांवर आरोग्य विषयक खर्च करणेसाठी मनपाने कोटयावधी रूपये खर्च केले आहेत. आरोग्य विषयक सुविधा देणे हे काम कायमस्वरूपी चालू राहणार आहे. वर्ल्ड हेल्थ ऑगनायझेशनने सांगितल्यानुसार भविष्यात अनेक गंभीर आजार येतील असा अंदाज आहे. अशा वेळी देखील मनपास आरोग्य विषयक कोटयावधी रूपयांचा खर्च करावा लागणार आहे. मनपाचे मुख्य उत्पन्न स्त्रोत मिळकत कर आहे. सदयस्थितीत होणारा खर्च व उत्पन्न यांचा अंदाज पाहता महानगरपालिकेस शाश्वत उत्पन्नाचे मार्ग शोधणे अत्यावश्यक आहे.

तरी सदर प्रकरणी आम्ही दिलेल्या मा.स्थायी समिती ठराव क्र.१३२ दि.१९/०५/२०२० या ठरावाचा फेरविचार करण्यात यावा.

**विषय क्रमांक :– ६९७ त्वर्य**

मा.आबा बागुल यांचे दि. २३/१०/२०२० चे पत्र.

पुणे महापालिकेचे उत्पन्न वाढीसाठी मनपाच्या मालकीच्या सदनिका विक्री करणे, ॲमिनिटी स्पेसेस विक्री करणेबाबत आपण निर्णय घेत आहोत. पुणे महापालिकेचे उत्पन्न कमी होत असून उत्पन्नाचे जकात, एलबीटी सारखे मार्ग बंद झालेले आहेत. उत्पन्नाची बाजू कमकुवत होत असल्याने पुणे महाापालिकेचे उत्पन्न कायमस्वरूपी वाढविणेसाठी आम्ही वेळोवेळी शाश्वत पर्याय सुचवित असतो. यामध्ये आम्ही मा.स्थायी समितीपुढे टुरिझम टॅक्स आकारणी करणेबाबत ठराव दिलेला होता. पुणे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविणे म्हणजे मनपाची संपत्ती विक्री करणे नाही तर शहरात देण्यात येणा–या सुविधांवर योग्य कर घेणे.

पुणे शहरात अन्य शहरातून, राज्यातून, देशातून नागरिक येत असतात. हे नागरिक शहरात आल्यानंतर शहरातील पाणी, उद्यान, ड्रेनेज, रस्ते, विद्युत अशा सेवांचा उपभोग घेतात, शहरात प्रदूषण करतात. या सुविधा महानगरपालिकेकडून पुरविण्यात येतात. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १२७ (२) मध्ये उपभोग, उपयोग याबाबत कर आकारणी करणेची स्पष्ट तरतूद केलेली आहे. देशातील अन्य महापालिकांमध्ये व परदेशामध्ये अशा प्रकारे शहरात येणा–या टुरिस्टवर कर आकारणी केलेली आहे. पुणे शहरात अन्य देशातून, राज्यातून विविध कामानिमित्त येणारे नागरिक फाईव्ह स्टार, थ्री स्टार अशा हॉटेलमध्ये वास्तव्य करतात, यावर र.रू.५०० /– र.रू.३००/– र.रू.२००/– अशा पध्दतीने टुरिझम कर आकारणी केल्यास मनपाच्या उत्पन्नामध्ये अंदाजे १०० कोटी इतकी कायमस्वरूपी वाढ होईल. टुरिझम टॅक्स या शब्दामुळे कर आकारता येत नसेल तर योग्य शब्द आपण ठरवून कर आकारणी करावी. आम्ही स्थायी समितीपुढे ठराव देण्याचा उद्देश मनपाने दिलेल्या सुविधांवर कर आकारणी करून मनपाचे उत्पन्न वाढविणे.

तरी सदर प्रकरणी आम्ही दिलेल्या मा.स्थायी समिती ठराव क्र.११७ दि.१२/०५/२०२० या ठरावाचा फेरविचार करण्यात यावा.

**विषय क्रमांक :– ६९८ त्वर्य**

मा.बाळा ओसवाल, मा.दिपक पोटे, मा.श्रीमती अमृता बाबर व मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि.२७/१०/२०२० चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. २२५ दि. ९/६/२०२० चा फेरविचार करण्यात येवून सदर ठरावात मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी अशी दुरुस्त करण्यात यावी.

**विषय क्रमांक :– ६९९ त्वर्य**

शिवाजीनगर घरांक ११९ येथील कोठी दरमहा नाममात्र भाडे स्विकारुन तीस वर्षे मुदतीकरीता मागासवर्गीय कर्मचारी संघटनेस संघटनेच्या कामकाजासाठी देण्यास मान्यता देणेबाबत मा.सौ.सरस्वती शेंडगे, उपमहापौर व मा.सुनिल कांबळे, आमदार यांचे दि. १९/१०/२०२० चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. ५५ दि.२३/१०/२०२० विचारासाठी.

**विषय क्रमांक :– ७०० त्वर्य**

**आरोग्य विषयक विविध सोईसुविधा व उपक्रमांबाबत नागरिकांना माहिती / जनजागृती करणे करिता शासनाने निश्चित केलेल्या संस्थांकडून कोटेशन मागवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३ क) अन्वये अदा करणेस, व कांचन नायक प्रोडक्शन प्रा.लि.पुणे यांची अंतर्गत सल्लागार समितीमध्ये नेमणूक करणेस त्यांची देयके या**

संस्थेस अदा करणेस व त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस व खालील नमूद केलेल्या अर्थशीर्षकावर बिलाची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/४०१ दि.२७/१०/२०२० चे पत्र.

महसुली कामासाठी - RE17F257

कोव्हीड - १९ अंतर्गत अत्यावश्यक महसुली कामासाठी (खर्च)

शिवाजी दौंडकर
प्रभारी नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.